**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत पाणलोट समितीच्या रचनेबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन निर्णय क्र. एपाव्य २०१२/प्र. क्र.१०४/जल-८,**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय , मुंबई -४०००३२
**दिनांक : १८ एप्रिल, २०१३.**

**संदर्भ -१)** शासन निर्णय क्र. एपाव्य २०१२/प्र. क्र.१०४/जल-८, दिनांक २७ सप्टेंबर,२०१२
२) शासन परिपत्रक क्र. एपाव्य २०१२/प्र. क्र.१०४/जल-८, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२.

## शासन निर्णय :

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत (IWMP) सरपंच यांच्या अध्यक्षेतेखाली पाणलोट समिती स्थापन्याचा व समितीच्या रचनेत बदल करण्याबाबतचा शासन निर्णय संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील दिनांक २७ सप्टेंबर,२०१२ अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे. यानुसार पाणलोट समितीतील अध्यक्ष व सचिवासह सद-यांची संख्या १५ इतकी करण्यात आली होती. सदर शासन निर्णयाविरुध्द याचिका क्र.८६८३/२०१२ अन्वये, तसेच इतरही याचिकाकर्त्यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल करुन सदर शासन निर्णयास आव्हान दिले होते.

२. याचिका क्रमांक ८६८३/२०१२ व इतर याचिकामध्ये दिनांक ५ डिसेंबर, २०१२ रोजी आणि दिवाणी याचिका क्र.१६१८/२०१३ मध्ये दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी शासन निर्णय दिनांक २७ सप्टेंबर,२०१२ प्रमाणे कृती व अंमलबजावणी करण्यास स्थगिती दिली आहे . तसेच केंद्र शासनाने योजनेसाठी तयार केलेल्या सामायिक मार्गदर्शक सूचनांनुसार, ग्रामसभेद्वारे नियुक्त झालेल्या पाणलोट समित्या ह्या पूर्वीप्रमाणेच काम पाहतील, असा अंतरिम न्यायनिर्णय दिलेला आहे.या न्यायनिर्णयाच्या अनुपालनार्थ शासन खालील प्रमाणे कार्यवाहीचे निदेश देत आहे.

**दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ पूर्वी ज्या ग्रामपंचायतीमध्ये पाणलोट समित्या ग्रामसभेद्वारे निवड व नियुक्त झाल्या होत्या त्या पूर्वीप्रमाणेच अस्तित्वात राहतील व पुढेही काम पाहतील. पाणलोट समितीची रचना पूर्वीप्रमाणेच राहिल. तसेच यापुढे सामायिक मार्गदर्शक सूचना २००८ सुधारित आवृती २०११ परि.६.३ मध्ये नमूद तरतूदीनुसार पाणलोट समित्या निवड व नियुक्त करण्याचे अधिकार ग्रामसभेलाच राहतील.**

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक **२०१३०४१८१२१२१०३७२६** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय (भूसंसाधन विभाग ) निर्माण भवन, नवी दिल्ली.
सह सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय (भूसंसाधन विभाग ) ब्लॉक क्र ११, ६ वा मजला सिजिओ कॉम्प्लेक्स, लोधीमार्ग, नवी दिल्ली.
मुख्य सचिव यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषी) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा,महाराष्ट्र राज्य, पुणे,
अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
मुख्य सरकारी वकील, उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद,
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर,
महासंचालक,माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे सर्व प्रतिनिधी,
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC)
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सह संचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व उप संचालक, सामाजिक वनीकरण,
सर्व तालुका कृषि अधिकारी,
सर्व सदस्य महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,
सर्व उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग , मंत्रालय, मुंबई - ३२.
जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.